पुढारी

# ‘फुले-शाहू-आंबेडकर’ सप्ताहाचे शिवाजी विद्यापीठात आयोजन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात १० ते १५ एप्रिल या कालावधीत ‘फुले-शाहू-आंबेडकर’ सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

सप्ताहाचे उद्‌घाटन पुणे येथील वसंतदादा इन्स्टिट्यूटचे संचालक शिवाजीराव देशमुख यांच्या हस्ते होणार आहे. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील. प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. सप्ताहाच्या पहिल्या दिवशी पंजाबराव देशमुख यांच्या स्मृतिदिनानिमित्त ‘भारतातील शेतीच्या समस्या’ विषयावर परिसंवाद होणार आहे.

महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्ताने ‘फुले, आंबेडकरांची भारतविषयक संकल्पना’ या विषयावर मंगळवारी परिसंवाद होणार आहे. बुधवारी (दि. १२) कवी संमेलन होणार आहे. गुरुवारी (दि. १३) सकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र येथे वक्तृत्व स्पर्धा होतील. शुक्रवारी (दि.१४) राजर्षी शाहू सभागृह सिनेट हॉल येथे डॉ. रमेश कांबळे, मुंबई विद्यापीठ, मुंबई यांचे ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सार्वजनिक चिकित्सक अवकाश’ या विषयांवर व्याख्यान होईल. शनिवारी (दि. १५) मानव्यशास्त्र सभागृहामध्ये आजी-माजी विद्यार्थी मेळावा होणार आहे.

सकाळ

# विद्यापीठाचे शंभर टक्के आर्थिक व्यवहार ऑनलाईन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वित्त व लेखा विभागांतर्गत कार्यरत जमा स्वीकृती कक्षामधील शंभर टक्के व्यवहार ऑनलाईन झाले. एकही व्यवहार रोखीने करण्यात आला नाही. या निमित्ताने कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह सर्वच अधिकाऱ्यांनी जमा स्वीकृती विभागाच्या कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले यांच्या मार्गदर्शनाखाली वित्त व लेखा विभागाने विद्यार्थ्यांसह विविध घटकांच्या सोयीसाठी ऑनलाईन रिसीट पोर्टलची निर्मिती केली. कोणत्याही ठिकाणावरून विद्यार्थी ऑनलाईन पध्दतीने आपले प्रवेश शुल्क किंवा परीक्षा शुल्क भरू शकेल. यावेळी वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, मानवविद्या विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ. तानाजी चौगुले, उपकुलसचिव रमेश लिधडे, सुरेश बंडगर, अधीक्षक सुभाष संकपाळ, सतीश हुक्केरी आदी उपस्थित होते.

सकाळ





**कोल्हापूर :** येथील मंगला लिंबेकर यांनी शिवाजी विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासनासाठीची देणगी प्रा. डॉ. विजय ककडे यांच्याकडे सुपूर्द केली. या वेळी डॉ. मनीषा काडाप्पा आदी उपस्थित होते.

# पापड विक्री करणाऱ्या लिंबेकर यांचे दातृत्व

कोल्हापूर : येथील मंगला लिंबेकर या शिवाजी विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासनाच्या विद्यार्थिनी आहेत. चरितार्थासाठी त्या पापड विकून उत्पन्न मिळवितात. परिस्थिती गरिबीची असली, तरी त्यांनी कष्टातून मिळालेल्या पैशांचे दान देण्याचे महत्त्व जाणून अध्यासनाला ११०० रुपयांची देणगी दिली. देणगीसाठी कुवतीपेक्षा दातृत्वाची भावना महत्त्वाची असते, हे या निमित्ताने आधोरेखित झाले आहे. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी लिंबेकर यांचे आभार मानले. भगवान महावीर अध्यासनाच्या इमारत बांधकामास सर्व दानशूर, व्यक्ती व संस्थांनी सढळ हस्ते मदत करावी, असे आवाहन प्राध्यापक डॉ. विजय ककडे यांनी केले. यावेळी डॉ. मनीषा काडाप्पा, पद्ममा आरगे, लीलावती कळंत्रे आदी उपस्थित होते.

04 APR 2023
लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पापड विकून दिली महावीर अध्यासनास देणगी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** पापड विकून चरितार्थ चालवणाऱ्या मंगला लिंबेकर यांनी शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाला यथाशक्ती देणगी दिली. कुवतीपेक्षा दातृत्वाची भावना महत्त्वाची असते हे मंगला लिंबेकर यांनी यानिमित्ताने अधोरेखित केले.

मंगला लिंबेकर या शिवाजी विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासनाच्या विद्यार्थिनी आहेत. आपल्या चरितार्थासाठी त्या पापड विकून उत्पन्न मिळवतात. परिस्थिती गरिबीची असली तरी त्यांनी कष्टातून मिळालेल्या पैशांचे दान देण्याचा निर्णय घेतला.

त्यांनी ११०० रुपयांची देणगी महावीर अध्यासनासाठी दिली आहे. या देणगीबद्दल शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी एस पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी लिंबेकर यांचे आभार मानले.

भगवान महावीर अध्यासनाच्या भव्य इमारत बांधकामास सर्व दानशूर, अहिंसा प्रेमी व्यक्ती व संस्थांनी सढळ हस्ते मदत करावी, असे आवाहन प्राध्यापक भगवान महावीर अध्यासनाचे प्राध्यापक डॉ. विजय ककडे यांनी केले आहे. देणगी आयकर सवलतीस पात्र आहे.



पापड विकून चरितार्थ चालवणाऱ्या मंगला लिंबेकर यांनी शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाला देणगी दिली.

सकाळ



वारणानगर : येथे विक्रेता प्रशिक्षण वर्गाच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलताना आमदार डॉ. विनय कोरे. व्यासपीठावर डॉ. सतीश घाळी, शुभलक्ष्मी कोरे, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. रामचंद्र पोवार आदी.

# वारणा बझारमध्ये विक्रेता प्रशिक्षण

वारणानगर, ता. ७ : ऑनलाईन काळातील स्पर्धेत टिकण्यासाठी विक्रेत्यांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवावा, असे आवाहन आमदार डॉ. विनय कोरे यांनी येथे केले.

वारणा बझार व शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन विस्तार विभागाच्या मान्यतेने मा. विलासराव कोरे कंझ्यु. को-ऑप. ट्रेनिंग सेंटर विक्रेता प्रशिक्षण वर्गाच्या २७ व्या बॅचचे प्रमाणपत्र वितरण व २८ व्या बॅचचे उद्‌घाटन गडहिंग्लजच्या विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. सतीश घाळी यांच्या हस्ते व आमदार डॉ. विनय कोरे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. यावेळी डॉ. कोरे बोलत होते.

प्रमुख पाहुणे डॉ. घाळी म्हणाले, 'यशस्वी होण्यासाठी माणसं घडविणे महत्त्वाचे असून हे काम वारणा बझारच्या ट्रेनिंग सेंटरने केले.' डॉ. ए. एम गुरव म्हणाले, 'ट्रेनिंग सेंटरमधील प्रशिक्षणार्थींनी चांगली कौशल्ये आत्मसात करावी.' वारणा बझारच्या अध्यक्षा शुभलक्ष्मी कोरे म्हणाल्या, 'विक्रेता नम्र असावा. त्याने नेहमी गोड भाषेत स्वागत करावे.' सरव्यवस्थापक शरद महाजन म्हणाले, 'बझारच्या सेंटरमधील अनेक प्रशिक्षणार्थी सहकारी व खासगी ग्राहक संस्थांत आहेत.' गतवर्षीचे यशस्वी स्वप्नील सुरेंद्र चौगुले पेठवडगाव, उदय दिनकर शिनगारे कोडोली, पूजा मारुती मोरे कोडोली यांचा गौरव झाला. रामचंद्र पोवार, कार्यकारी संचालक शहाजी भगत, उपाध्यक्ष सुभाष देसाई, संचालक विजय पाटील, राजाराम गुरव, बबूताई महापुरे, मनीषा पाटील, स्मिता कापरे, प्रा. डी. एस. पोवार, प्रा. एस. व्ही. पोवार, प्रा. कुलकर्णी, प्रा. बी. व्ही. वळगड्डे, प्रा. डी. एस. गुरव, डॉ. एन. ए. पाटील, अरुणा गुरव, शिवाजी पाटील, दिलीप पाटील, महेश आवटी, संदीप पाटील, तानाजी ढेरे, हणमंत दाभाडे, रघुनाथ मलगुंडे उपस्थित होते. प्रा. पी. बी. बंडगर यांनी सूत्रसंचालन केले. संचालक विश्वनाथ पाटील यांनी आभार मानले.

08 APR 2023
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पश्चिम महाराष्ट्रात नव्या ११७ महाविद्यालयांची मागणी

## विद्यापीठाचा बृहत आराखडा : कौशल्याधारित महाविद्यालयांना पसंती

संदीप आडनाईक
लोकमत न्यूज नेटवर्क


कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातून तब्बल ११७ नव्या महाविद्यालयांची मागणी आहे. कोल्हापूर जिल्ह्यातून सर्वाधिक १२, सांगलीतून ५३ आणि सातारा जिल्ह्यातून ५२ महाविद्यालयांची मागणी आहे. यात व्यावसायिक आणि कौशल्याधारित अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांची संख्या सर्वाधिक आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात २०२४-२५ ते २०२८-२९ या शैक्षणिक वर्षासाठी पंचवार्षिक बृहत आराखड्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे, गुगल मिटद्वारे विविध बिंदूवर आधारित ६ एप्रिलपर्यंत ५०२४ सूचना विद्यापीठाकडे प्राप्त झाल्या आहेत. यामध्ये अगदी डेन्मार्क, केनिया, बिहारमधील गया, राजस्थान, गुजरात येथूनही अभिप्राय आले आहेत, अशी माहिती उपसमितीचे अध्यक्ष कुलपती नामनिर्देशित व्यवस्थापन परिषदेचे सदस्य सिद्धार्थ शिंदे यांनी दिली.

पाच वर्षांच्या शैक्षणिक गरजांचा विचार करून हा आराखडा तयार केला जात आहे. एकही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाही, यासाठी विद्यापीठ प्रयत्न करीत आहे. विद्यार्थी, पालक, शिक्षक, प्राचार्य, शैक्षणिक संस्था प्रतिनिधी, लोकप्रतिनिधी आणि शेतकऱ्यांसह अन्य घटक गुगल मिटवरील प्रश्नावलीद्वारे अभिप्राय नोंदवीत आहेत. संकेतस्थळावरून सरकारकडे अभिप्राय नोंदविण्याची नवी सोय आता आली आहे.

### असे आहेत प्रस्ताव

फार्मसी इन आयुर्वेदा, टूरिझम अँड हॉस्पिटॅलिटी, आर्किटेक्चर, किचन गार्डनिंग, टेरेस गार्डनिंग, शेतीपूरक अभ्यासक्रम, समुपदेशन, इव्हेंट मॅनेजमेंट, क्रिमिनॉलॉजी, रुरल डेव्हलपमेंट मॅनेजमेंट, स्लम इम्प्रूव्हमेंट प्रोग्रॅम, आपत्ती व्यवस्थापन, न्यूट्रिशन अँड डायटेटिक्स, लोककला, फॉरेन्सिक सायन्स, ग्राहक संरक्षण, उर्दू कॉलेज, वास्तुशास्त्र, रुग्ण परिरक्षण.






| | |
|---|---|
| प्राचार्य/संचालक | १०५ |
| शिक्षक | ७८३ |
| पालक | ३२१ |
| बिगर शासकीय संस्था | ८४ |
| कॉलेज मॅनेजमेंट | ३५ |
| उद्योजक | ९ |

| | |
|---|---|
| शिक्षणतज्ज्ञ | ७ |
| अधिकार मंडळ सदस्य | २९ |
| नोकरदार, एचआर व्यवस्थापक | ७ |
| विद्यार्थी | ३१२५ |
| माजी विद्यार्थी | ४२९ |
| प्रशासकीय अधिकारी/कर्मचारी | ९० |

नरेंद्र जाधव समितीच्या शिफारशींचा विचार करून बृहत आराखड्यात 'जीआय' या डिजिटल पद्धतीने नवीन बिंदू नोंदविण्यात येत आहेत. याचा आराखड्यात समावेश होईल. अभिप्रायांसाठी आता १५ एप्रिलपर्यंत मुदत आहे. यावर जास्तीत जास्त सूचना पाठवाव्यात.

**- डॉ. विलास सोयम,**
उपकुलसचिव, संलग्नता विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

पुढारी

# विद्यापीठ अभ्यास मंडळावर सीए अमितकुमार गावडे यांची नियुक्ती

कोल्हापूर : येथील चार्टर्ड अकऊंटंट (सीए) अमितकुमार अंकुश गावडे यांची अकाऊंटन्सी विषयासाठी शिवाजी विद्यापीठाच्या अभ्यास मंडळावर नियुक्ती झाली आहे. विद्यापीठाच्या अभ्यास मंडळावर निवड झालेले गावडे चंदगडचे सुपुत्र आहेत. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत गावडे सीए झाले आहेत. बारावी कॉमर्समध्ये बोर्डात व बी.कॉम परीक्षेमध्ये विद्यापीठात पाचवा क्रमांक पटकाविला होता. निवडीबद्दल त्यांचे कौतुक होत आहे.

पुढारी

संक्षिप्त

# विद्यापीठ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे विद्यार्थ्यांना नावे नोंदविण्याचे आवाहन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रामार्फत ३० एप्रिल रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या ग्रुप बी व सी संयुक्त पूर्व परीक्षेसाठी तीन सराव पेपरचे मोफत आयोजन केले आहे. विद्यार्थ्यांनी १२ एप्रिलपर्यंत नावे नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. स्पर्धा परीक्षा केंद्राच्या वतीने सराव पेपर दि. १३, १७ व १९ एप्रिल रोजी ११ ते १२ या वेळेत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रामध्ये होणार आहे. नाव नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना सराव परीक्षेसाठी प्रवेश दिला जाईल. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. पी. एस. कांबळे यांनी केले आहे.



तरुण भारत

# स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रासाठी नाव नोंदवा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रामार्फत ३० एप्रिल रोजी होणाऱ्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या ग्रुप बी व ग्रुप सी संयुक्त पूर्व परीक्षेसाठी तीन सराव पेपरचे मोफत आयोजन केले आहे. इच्छुकांनी १२ एप्रिलपर्यंत प्रत्यक्ष किंवा दूरध्वनीव्दारे नावनोंदणी करावी. सराव पेपर १३, १७ आणि १९ एप्रिलला विद्यापीठातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात सकाळी ११ ते १२ या वेळेत होणार आहे. विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केंद्राचे समन्वयक कांबळे यांनी केले आहे.

0 8 APR 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अ.भा. आंतरविद्यापीठ शूटिंग स्पर्धा



कोल्हापूर : मेरठ येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ शूटिंग स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ पुरुष संघाने १० मीटर एअर रायफल प्रका
रौप्यपदक पटकावले. संघात सुमेध सासणे, आदित्य साळोखे, प्रतीक जोग यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. त्यांची निवड उत्तर प्रदेश येथे होणा
खेलो इंडिया स्पर्धेसाठी झाली आहे. संघाला प्रशिक्षक प्रा. विजय रोकडे, संघ व्यवस्थापक प्रा. गौतम घुणकी, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ.
एस. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे व क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांचे मार्गदर्शन लाभले.